अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड । शनिवार
२९.०८.२०२६

वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485


वर्ष: ०७ | अंक: २१० | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

# मुंढेंच्या एफडीएला कोर्टाचा दुसऱ्यांदा झटका, आणखी एक निर्णय फिरवला

**कायद्याच्या लढाईत एमसीएचा विजय**



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मुंबई क्रिकेट असोसिएशन आणि अन्न व औषध प्रशासन यांच्यातील वादात चउअला मोठा दिलासा मिळाला आहे. बीकेसी येथील एमसीएक्लबच्या किचनवर एफडीएने घातलेली बंदी न्यायालयाने उठवण्याचे आदेश दिले आहेत. २० ऑगस्ट रोजी एफडीएने केलेल्या पहिल्या तपासणीत एमसीए क्लबच्या किचनला ११० पैकी ८७ गुण मिळाले होते. त्यानंतर २५ ऑगस्टला पुन्हा निरीक्षणाचे आदेश देण्यात आले. २७ ऑगस्ट रोजी झालेल्या दुसऱ्या तपासणीत किचनचे गुणांकन वाढून ९५ झाले. तरीही कारवाई सुरू राहिल्याने चउअने न्यायालयात धाव घेतली.


सुनावणीदरम्यान समाधानकारक गुणांकन असताना किचनवर बंदी घालण्याच्या एफडीएच्या निर्णयावर न्यायालयाने प्रश्न उपस्थित केले. अखेर न्यायालयाने किचनवरील बंदी तातडीने उठवण्याचे आदेश दिल्याने एमसीएला दिलासा मिळाला आहे.

प्रतिष्ठित संस्थांवर कारवाई करून काय सिद्ध करायचे आहे, हेच कळत नाही दरम्यान, या निर्णयावर एमसीए बीकेएचे अध्यक्ष अजय देसाई यांनी समाधान व्यक्त केले. 'प्रतिष्ठित संस्थांवर कारवाई करून काय सिद्ध करायचे आहे, हेच कळत नाही. शेवटी कोर्टाने न्याय दिला. ब्रँड हा ब्रँड असतो. एमसीए बीकेए हा एक प्रतिष्ठित ब्रँड आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

२० ऑगस्टला एफडीए ची पहिली तपासणी झाली. तर २५ ऑगस्टला पुनर्तपासणीचे आदेश देण्यात आले. यात २७ ऑगस्टला ९५ गुणांचे दुसरे मूल्यांकन आणि २९ ऑगस्टला न्यायालयाचा चउअच्या बाजूने निर्णय दिला, अशी या संपूर्ण प्रकरणाची टाइमलाइन आहे. किचनवरील बंदी उठवण्याचे आदेश कोर्टाच्या निर्णयामुळे एमसीए क्लबच्या किचनचे कामकाज पुन्हा सुरू होण्याचा मार्ग मोकळा.

# महापुरात आतापर्यंत ६२६ जणांचा मृत्यू

**२ हजारांहून अधिक बेपत्ता, बचावकार्य सुरूच**



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**काठमांडू** – नेपाळमध्ये बुधवारी आलेल्या भीषण महापुरामुळे आतापर्यंत ६२६ जणांचा मृत्यू, तर २ हजारांहून अधिक जण बेपत्ता असल्याची माहिती समोर आली आहे. रसुवा, नुवाकोट, चितवन, धादिंगसह आठ जिल्ह्यांना पुराचा मोठा फटका बसला असून, नेपाळ लष्कर आणि सुरक्षा दलांकडून शनिवारी (दि.२९) सलग चौथ्या दिवशी बचाव आणि मदतकार्य सुरू आहे. पुरामुळे घरे, रस्ते, पूल आणि जलविद्युत प्रकल्पांचे मोठे नुकसान झाले असून, बेपत्ता नागरिकांचा शोध घेण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. आठ जिल्ह्यांतून ६२६ मृतदेह बाहेर

एनडीआरआरएमएनुसार, चितवन मधून सर्वाधिक २३३ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. नवलपरासी पूर्वमधून १५८, नुवाकोटमधून ५१, गोरखामधून ४८, नवलपरासी पश्चिममधून ४७, धादिंगमधून ४५, तनहूमधून ३१ आणि रसुवामधून १३ मृतदेह सापडले आहेत. बुधवारी रसुवा आणि मध्य नेपाळच्या विविध भागांत आलेल्या अचानक पुरामुळे वस्त्या, रस्ते, पूल आणि जलविद्युत प्रकल्पांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. पुराच्या पाण्यामुळे अनेक भागांचा संपर्क तुटला आहे.

**बचावकार्य चौथ्या दिवशीही सुरू**

महापुरानंतर सलग चौथ्या दिवशी शनिवारीही बचाव आणि मदतकार्य सुरू होते. नेपाळमधील सुरक्षा दलांनी ४,४०० हून अधिक नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवले आहे. मात्र, दुर्गम भागांमध्ये अद्याप अनेक नागरिक अडकले असून, २,४२६ जण बेपत्ता असल्याने शोधमोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. पुराचा धोका कायम असल्याने नदीकाठच्या आणि बाधित भागांतील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

**मृतदेहांची ओळख पटवणेही आव्हानात्मक**

भोटेकोशीच्या पुरात वाहून गेलेले मृतदेह नदीच्या खालच्या प्रवाहातील चितवन, तनहू, नवलपरासी आणि इतर भागांत सापडत आहेत. त्यामुळे रुग्णालयांच्या शवागारांवर मोठा ताण आला आहे.

## थोडक्यात

**स्मार्ट रेशन कार्ड वाटप सुरू : क्यूआर कोड असलेल्या अत्याधुनिक कार्डाची वैशिष्ट्ये, प्रक्रिया**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्रातील शिधापत्रिकाधारकांसाठी एक महत्त्वाची बातमी असून, पारंपारिक कागदी रेशन कार्डऐवजी आता टठ कोड असलेले अत्याधुनिक स्मार्ट रेशन कार्ड देण्याची मोहीम १५ ऑगस्ट २०२६ पासून सुरू करण्यात आली आहे.

शासन आणि अन्न, नागरी पुरवठा विभागाकडून डिजिटल प्रणाली टप्प्याटप्प्याने लागू केली जात असून, या माध्यमातून धान्य वितरण प्रक्रियेत पारदर्शकता आणण्याचा उद्देश आहे.पहिल्या टप्प्यात कोणाला मिळणार स्मार्ट कार्ड? या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात केवळ पिवळ्या आणि केसरी शिधापत्रिकाधारकांना हे स्मार्ट रेशन कार्ड दिले जात आहे.

# पाकव्याप्त काश्मीरमध्ये असंतोष उसळला : लष्करी नियंत्रणाविरोधात संयुक्त आवामी कृती समिती'चे मोठ्या आंदोलनाचे आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**काश्मीर (पाकिस्तानी)** – पाकव्याप्त काश्मीरमधील पाकिस्तानी लष्कराच्या दडपशाहीविरोधात तेथील नागरिकांचा संताप अखेर



उफाळून आला आहे. पाकिस्तानी लष्कर आणि प्रशासनाच्या जुलमी राजवटीला विरोध दर्शवत, जम्मू आणि काश्मीर संयुक्त आवामी कृती समितीने या भागात पुन्हा एकदा व्यापक आंदोलनांची घोषणा केली आहे. शैक्षणिक संस्था आणि वैद्यकीय केंद्रांवर ताबा मिळवून लष्कराने नागरिकांचे मूलभूत हक्क हिरावून घेतल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, पाकिस्तानी सुरक्षा दलांच्या अवाजवी उपस्थितीमुळे आणि नाकेबंदीमुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. महाविद्यालये आणि प्रमुख रुग्णालयांवर लष्कराने ताबा घेतल्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे. आजारी आणि जखमी नागरिकांना रुग्णालयांपर्यंत पोहोचण्यास मज्जाव केला जात असल्याने गंभीर आरोग्य समस्या निर्माण झाल्या आहेत. पूंछ विभागातील धिरकोट येथे दुपारी दीड वाजता मोठे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. भगिनी आणि विद्यार्थिनींना नेतृत्वाचे आवाहन करण्यात आले असून, पालकांना मुलांना शालेय गणवेशात आणि दप्तरांसह आणण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, जे शिक्षणावरील बंधनांविरोधातील निषेधाचे

# बँक खाती वापरण्यास ममता बॅनर्जींना परवानगी नाही



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**कोलकाता** – कोलकाता उच्च न्यायालयाने गुरुवारी तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी गटाला मोठा झटका दिला. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमधील तृणमूल काँग्रेसची गोठवण्यात आलेली सुमारे ८०४ कोटी रुपयांची चार बँक खाती वापरण्यास परवानगी देणारा कोणताही अंतरिम आदेश देण्यास उच्च न्यायालयाने ठाम नकार दिला. पक्षाच्या दैनंदिन खर्चासाठी आधीच विशेष व्यवस्था करण्यात आल्याचे सांगत न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. न्या. सौगत भट्टाचार्य यांच्या खंडापीठाने स्पष्ट केले की, दुर्गा पूजेच्या सुट्टीनंतर या प्रकरणावर पुढील सुनावणी होईल.

# कत्तलीसाठी नेल्या जात असलेल्या गोवंशाची वरुड पोलिसांनी केली सुटका : दोघे अटकेत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – कत्तलीसाठी नेल्या जात असलेल्या गोवंशाची सुटका करण्यात वरुड पोलिसांना यश आले असून या प्रकरणी २ गोवंशासह एका वाहन पोलिसांनी जप्त केले असून दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे. ही घटना तालुक्यातील राजुराबाजार ते उदापुर रस्त्यावर उघडकीस आली. या प्रकरणी पोकॉ.गजानन सोनोने यांचे फिर्यादीवरुन वरुड पोलिसांनी विविध गुन्हे दाखल केले आहेत.

एक पांढऱ्या रंगाची बोलेरो पिकअप वाहन आले त्यास थांबविले असता त्यामध्ये दोन गोवंश किंमत मिळुन आले. त्यामध्ये एक गोवशसांला टॅग होते, त्याचा एक बोलेरो पिक अप गाडी क्र. एम.पी. २८ जी ३३८७ किंमत अंदाजे ५ लाख असुन नाव मुन्नीलाल उईके असे येत होते व दुसया गोवंषाला टॅग




नव्हते गाडी मध्ये दोन इसम बसलेले होते. त्यापैकी गाडी चालक यास नाव विचारले असता त्याने त्याचे नाव सागर माधव पावनकरार यास पावती गोवंष आहे का? याबाबत विचारले असता त्याचेजवळ कोणत्याही प्रकारची पावती नव्हती. सदर गोवंश हे कमी जागेत आखुड दोरीने बांधलेले बघितले, अवस्थेत त्यांना हात पाय हलविता येणार नाही. अशा स्थितीत कत्तल करण्याच्या हेतुने नेत होते. सदर गोवंश कोणाचे आहेत? यांबाबत विचारले असता उडवाउडवीचे उत्तर दिले. याप्रकरणी निलेश वसंत कोसरे (३०) रा.पंढरी ता.सौसर जि.छिदवाडा, सागर माधव पावनकरार (२४) रा.पिपला नारायणवार जि.छिदवाडा यांचेविरुध्द कलम ३०३ (२) बीएनएस सहकलम ५ (अ) (ब) ९ महा.प्राणी संरक्षण अधिनियम सहकलम ११ (१) (डि) (जे) (इ) प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० सहकलम ११९ महा. पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास सुरु आहे.









# सेवामुक्त अग्निवीरांना शासकीय सेवेत संधी : राज्य सरकार एक हजाराहून अधिक पदे निर्माण करणार



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – सैन्यदलात चार वर्षांची सेवा पूर्ण करून सेवामुक्त होणाऱ्या माजी अग्निवीरांना राज्य सरकारच्या विविध विभागांमध्ये पुनर्नियुक्ती दिली जाणार आहे. यासाठी सरकारी आणि निमसरकारी सेवेत एक हजाराहून अधिक पदे निर्माण करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या पदांवर नियुक्तीची पद्धत तसेच पुढे त्यांना नियमित सेवेत सामावून घेण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय सचिव समिती गठीत करण्यात आली आहे. सैन्यदलातील अग्निपथ योजनेंतर्गत तरुण-तरुणींना चार वर्षांच्या कालावधीसाठी सैन्यात भरती केले जाते. या कालावधीत त्यांना शिस्त, नेतृत्व, तांत्रिक कौशल्य, आपत्ती व्यवस्थापन, सुरक्षा आणि संघटनात्मक कार्यपद्धतीचे प्रशिक्षण दिले जाते. चार वर्षांची सेवा पूर्ण झाल्यानंतर कामगिरी, शिस्त आणि कौशल्यांच्या आधारे २५ टक्के अग्निवीरांना कायमस्वरूपी सैन्यदलात संधी मिळते, तर उर्वरित ७५ टक्के अग्निवीर सेवामुक्त होतात. २०२२ मध्ये भरती झालेले अग्निवीर यावर्षी सेवामुक्त होणार आहेत. तात्पुरती अधिसंख्य पदे निर्माण अशा सेवामुक्त अग्निवीरांसाठी गृह, राज्य उत्पादन शुल्क, वन आणि नगरविकास विभागांतर्गत गणवेशधारी गट-क पदांचा विचार करण्यात आला आहे.अग्निवीरांना नियमित सेवाप्रवेश देण्याचे धोरण निश्चित करण्यासाठी काही कालावधी जाणार असल्याने त्यांच्यासाठी तात्पुरती अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आली आहेत.

# विद्यानिकेतन सीबीएसई स्कूलच्या विद्यार्थिनींनी जवानांच्या मनगटावर बांधली राखी

## देशरक्षण करणाऱ्या जवानांसोबत रक्षाबंधन साजरे | विद्यार्थ्यांच्या देशभक्तीपर गीतांनी जवानांची मने जिंकली

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**धामणगाव रेल्वे** – केंद्रीय गोळा-बारूद डिपो, पुलगाव येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही रक्षाबंधनाचा पवित्र सण उत्साह, आपुलकी आणि देशप्रेमाच्या वातावरणात साजरा करण्यात आला.

केंद्रीय गोळा-बारूद डिपो CAD च्या मुख्य समुपदेशकांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या विशेष कार्यक्रमातून देशाच्या सुरक्षेसाठी सदैव तत्पर असलेल्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. धामणगाव एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित विद्यानिकेतन सीबीएसई स्कूलच्या विद्यार्थिनींनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेत देशसेवेत कार्यरत जवानांच्या मनगटावर प्रेमाने राखी बांधली. यावेळी विद्यार्थिनींनी जवानांना मिठाई देत त्यांच्या दीर्घायुष्याची, उत्तम आरोग्याची आणि सुरक्षिततेची प्रार्थना केली. आपल्या कुटुंबापासून दूर राहून देशाच्या रक्षणासाठी अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या जवानांसोबत रक्षाबंधन साजरे करताना विद्यार्थिनींमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला.

राखी बांधताना 'देशाचे रक्षण करणारे जवान हे संपूर्ण देशाचे भाऊ आहेत,' या भावनेतून विद्यार्थिनींनी जवानांप्रती आपुलकी आणि कृतज्ञता व्यक्त केली. दरम्यान, विद्यानिकेतन सीबीएसई स्कूलच्या विद्यार्थ्यांनी जवानांच्या शौर्याला सलाम करत विविध देशभक्तीपर गीतांचे भावपूर्ण सादरीकरण केले. विद्यार्थ्यांच्या सुरेल आणि उत्साहपूर्ण गीतांनी कार्यक्रमस्थळी देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांच्या या कलाविष्काराचे जवानांनी कौतुक करत त्यांना शुभेच्छा दिल्या. या उपक्रमासाठी विद्यानिकेतन सीबीएसई स्कूलचे शिक्षक शुभम जुनघरे, शुभम मिश्रा, चारूलता दारोकर, शुभांगी इंगळे, स्नेहल कोटनाके आणि हर्षल नरोडे उपस्थित होते. तसेच मिल्ट्री कॅम्पचे अनिल गावंडे यांचे विशेष सहकार्य लाभले.

या रक्षाबंधन कार्यक्रमात लोकमत सखी मंच, श्री साई शीला सखी मंच, योग वेदांत सेवा समिती, ऑल इंडिया ॲक्टिव्ह वुमन्स ग्रुप, सखी उत्साही मंच (वर्धा) यांच्यासह विविध सामाजिक व महिला संस्थांच्या प्रतिनिधींनीही सहभाग नोंदविला. देशाच्या सीमा आणि राष्ट्राचे रक्षण करणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा विद्यानिकेतन सीबीएसई स्कूलचा या उपक्रमातील सहभाग विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रभक्ती, त्यागाची भावना आणि सामाजिक बांधिलकी रुजविणारा ठरला.

# गरिबांच्या घराचं स्वप्न होणार साकार!

**मलेशियातील माय वन तंत्रज्ञानानं भंडाऱ्यात उभारली बिना विटांची म्हाडा वसाहत, एकनाथ शिंदेंच्या हस्ते होणार लोकार्पण**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – अत्यल्प उत्पन्न गटातील नागरिकांना हक्काचं आणि परवडणारं घर उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण विभागानं भंडाऱ्यात २२४ फ्लॅट्सची सुसज्ज वसाहत उभारली आहे. मलेशियातील अत्याधुनिक 'माय वन टेक्नॉलॉजी'चा, वापर करून उभारलेली ही भंडारा जिल्ह्यातील पहिलीच बिना विटांची वसाहत आहे. ग्राउंड प्लस तीन मजल्यांच्या एकूण ७ विंग्समध्ये ही वसाहत तयार झाली असून सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते याचं थाटात लोकार्पण होणार आहे. शासनाच्या या महत्त्वपूर्ण उपक्रमामुळं भंडाऱ्यातील अल्प उत्पन्न घटकांतील अनेक कुटुंबांचं हक्काच्या, मजबूत आणि अत्याधुनिक घराचं स्वप्न आता प्रत्यक्षात साकार होणार आहे.

अत्याधुनिक 'माय वन टेक्नॉलॉजी'चा, वापर भंडारा जिल्ह्यातील पहिलीच बिना विटांची वसाहत दरम्यान, एकूण २२४ पैकी २०० फ्लॅट्सवर पीएम आवास योजनेंतर्गत विशेष सबसिडी मिळणार आहे. म्हाडाची मूळ किंमत ११,९८,९३४ रुपये असून सबसिडीनंतर हा फ्लॅट नागरिकांना अवघ्या ९,४८,९३४ रुपयांत उपलब्ध होईल. तर पती-पत्नीचे एकत्रित वार्षिक उत्पन्न ३ लाख रुपयांपर्यंत असणारे नागरिक या योजनेसाठी पात्र ठरतील. त्यामुळे गरिबांच्या घराचं स्वप्न आता साकार होणार असून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार, अशी माहिती म्हाडा गृहनिर्माण वसाहतचे अभियंता रविना नरवरिया यांनी दिली.

# जिल्हा स्त्री रुग्णालयात विद्युतीकरण, अग्नीसूचक आणि अग्निशामक यंत्रणा सुस्थितीत असल्याचे सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाचे स्पष्टीकरण

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अमरावती** – जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात बालक अतिदक्षता कक्षाच्या व्हेंटिलेटरमध्ये स्फोट होऊन २४ ऑगस्ट रोजी पहाटे ३.३० वाजता दुर्दैवी घटना घडली. या घटनेबाबत प्रसार माध्यमे आणि समाज माध्यमावर वस्तुस्थितीशी विसंगत काही बातम्या प्रसारित झाल्या असून त्याची वस्तुस्थितीदर्शक माहिती सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग अमरावती मुख्य अभियंता कार्यालयाकडून देण्यात आली आहे. एप्रिल व मे २०२६ मध्येच सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाने जिल्हा स्त्री रुग्णालय, जिल्हा सामान्य रुग्णालय व इतर रुग्णालयातील अग्नीसूचक व अग्निशमन यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती करून महापालिकेच्या अग्निशमन अधिकाऱ्याकडे फॉर्म-बी सादर करण्याकरता ई-निविदा पूर्ण झालेली होती. संबंधित फायर कंत्राटदारास २३ जून २०२६ रोजीच कार्यारंभ करण्याचा आदेश जारी करण्यात आला होता.

विभागाद्वारे आवश्यक कार्यवाही आधीच पूर्ण केलेली आहे त्यामुळे ३७ दिवस पत्राकडे दुर्लक्ष केल्याची माहिती वस्तुस्थितीला धरून नसल्याचे सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग अमरावती मुख्य अभियंता कार्यालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

आवश्यक यंत्रणा दुरुस्ती करून कंत्राटदाराने प्राथमिक फायर ऑडिट अहवाल ३० जून २०२६ रोजी सादर केला. संपूर्ण यंत्रणा सुस्थितीत असल्याची शहानिशा करून २२ ऑगस्ट रोजी यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली होती असे सांगून फायर ऑडिट झाले नसल्याची बाब वस्तुस्थितीशी सुसंगत नसल्याचे सांगण्यात आले आहे. विद्युत संच मांडणीचा दर्जा योग्य असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यानुसार वीज संच मांडणी मधील सर्व सुरक्षा उपकरणे, संपूर्ण वायरिंग, स्विच गिअर हे भारतीय मानक ब्युरो मानांकित व उच्च दर्जाचीच आहेत तसेच रुग्णालयातील अतिदक्षता कक्ष व नवजात बालक कक्षात विद्युत विभागाद्वारे करण्यात आलेल्या विद्युत संच मांडणीत ओव्हर करंट व अर्थ फॉल प्रोटेक्शन करिता त्रिस्त्रीस्तरीय विद्युत सुरक्षा प्रणालीचा अवलंब करण्यात आला होता व ज्या व्हेंटिलेटर मध्ये स्पोट होऊन ही दुर्दैवी घटना घडली त्यावेळेस संबंधित व्हेंटिलेटरची ३२ ए क्षमतेची आरसीबीही ट्रीप झालेली होती असे सांगण्यात आले आहे.

३० जुलै २०२६ रोजी रुग्णालयातील ६१ अग्निशमन यंत्रणांचे रिफिलिंग करून रुग्णालयात पुन: स्थापित करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागामार्फत जिल्हा स्त्री रुग्णालयात विद्युतीकरण, अग्नीसूचक आणि अग्निशामक यंत्रणा कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. मे ते जुलै २०२५ पर्यंत टप्प्याटप्प्याने या रुग्णालयाकडे ही यंत्रणा रीतसरपणे हस्तांतरित करण्यात आली आहे. हस्तांतरणाच्या वेळी महापालिकेचे अग्निशमन अधिकारी, फायर कंत्राटदार, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाचे अधिकारी-कर्मचारी तथा रुग्णालयातील अधिकारी-कर्मचारी यांच्यासह संयुक्तपणे संपूर्ण यंत्रणेचे मॉक ड्रिल घेण्यात आले व आपत्कालीन परिस्थितीत ही यंत्रणा कशी हाताळायची याबाबत प्राथमिक सूचना देण्यात आल्या होत्या.

संपूर्ण संच मांडणीची देखभाल व दुरुस्ती विषयक कामे विभागाद्वारे नियमितपणे करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले आहे.

## अमरावती जिल्हा ड्रायव्हिंग स्कूल संघटनेच्या

# जिल्हा प्रसिद्धीप्रमुखपदी संजय खासबागे

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – अमरावती जिल्हा ड्रायव्हिंग स्कूल संघटनेच्या जिल्हा प्रसिद्धी प्रमुखपदी यश ड्रायव्हिंग स्कूल वरुडचे संचालक संजय खासबागे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

संजय खासबागे हे पत्रकारिता क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभवासोबतच ड्रायव्हिंग स्कूलच्या माध्यमातुन विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत आहेत. त्यांच्या कार्यक्षमता आणि जनसंपर्क कौशल्याचा विचार करून संघटनेने त्यांच्यावर जिल्हा प्रसिद्धी प्रमुखपदाची जबाबदारी सोपविली आहे. या नियुक्तीमुळे अमरावती जिल्हा ड्रायव्हिंग स्कुल संघटनेच्या विविध उपक्रमांना अधिक व्यापक प्रसिद्धी मिळून संघटनेच्या कार्याला नवी गती मिळेल, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अजय जाधव, सचिव सोपान ढोले, गुहे, अन्शुल पाल, सचिन तांबटकर, संजय बदखुळे, हरीश ढोबळे, जगदीश वर्होकर, राधेश्याम हरणे, अमोल बांबल, आकाश चौधरी, अविनाश वर्होकर यांच्यासह जिल्ह्यातील अनेक ड्रायव्हिंग स्कूल संचालक उपस्थित होते.

## निट परिक्षेमध्ये ६५६ गुण मिळविणाऱ्या

# अर्जुनच्या मातापित्यांचा शिवमहापुराण सोहळ्यात सत्कार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – भद्रुशेष महाराज संस्थान जरुड येथे सुरु असलेल्या शिवमहापुराण कथेत ज्ञान, भक्ती आणि सामाजिक बांधिलकीचा अनोखा संगम पाहायला मिळाला. कथावाचक ह.भ.प.सोपानकाका काळपांडे यांच्या अमृतवाणीतुन शिवचरित्राचा जागर सुरु असतानाच मंडळाने एक आदर्शवत सामाजिक उपक्रम राबविला. जरुडचे माजी सरपंच गणेश देशमुख यांचे चिरंजीव अर्जुन याने नुकत्याच जाहीर झालेल्या निट परीक्षेत घवघवीत ६५६ गुण मिळवुन घवघवीत यश संपादन केले, त्यानिमित्ताने अर्चना व गणेश देशमुख यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.

तब्बल २४ लाख विद्यार्थ्यांमधुन अर्जुन याने ७२० पैकी ६५६ गुण मिळवुन सर्वसाधारण गटात १०५० वा आणि ओबीसी प्रवर्गात ३२२ वा क्रमांक पटकाविला आहे.

जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर मिळविलेल्या या यशामुळे तो संपूर्ण जरुड गावाचा भूषण ठरला आहे. यावेळी व्यासपीठावरुन बोलताना ह.भ.प.सोपानकाका काळपांडे म्हणाले की, अर्जुनने मिळवलेले यश हे फक्त त्याच्या कुटूंबियाचे नाही तर संपूर्ण जरुड गावाचे येणाऱ्या पिढीसाठी हा प्रेरणास्त्रोत आहे.

याप्रसंगी विठ्ठलराव सदाफळे, जगदीश गवळी, विष्णु राऊत, गजानन चौहान, प्रमोद दुधे, शेषराव कडू, हेमंत टोंगसे, कैलास वाडोदे, विनोद बाहे, सोपान ढोले, पुष्पा सातपुते, रिंकेश राजस, श्वेतालिका पटेल, अंजली तुमडाम, नाना इंगळे, वैभव दुधे, चेतना नेरकर, रवी माकोडे, कल्पना राजस आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय

**{ काळानुसार बदला, नाहीतर काळ तुम्हाला बदलून टाकेल. }**

## माणसांसाठी सण की सणांसाठी माणूस?

मानव हा उत्सवप्रिय प्राणी आहे. जन्मापासून मृत्यूपर्यंत जीवनातील प्रत्येक टप्प्यावर सण, उत्सव आणि परंपरा माणसाला आनंद, एकोपा आणि नवचैतन्य देतात. विशेषतः भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात प्रत्येक सणामागे धार्मिक, ऐतिहासिक, सामाजिक किंवा सांस्कृतिक अशी समृद्ध पार्श्वभूमी आहे. गणेशोत्सवासारख्या सार्वजनिक उत्सवांनी समाजाला एकत्र आणण्याचे, प्रबोधन घडवण्याचे आणि राष्ट्रीय एकात्मतेचे कार्य केले. मात्र, आजच्या काळात एक गंभीर प्रश्न उभा राहतोङ्कसण माणसासाठी आहेत की माणूस सणांसाठी? लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात ब्रिटिश सत्तेविरुद्ध लोकांमध्ये जागृती आणि संघटन निर्माण करण्यासाठी केली. त्या काळी गणेशोत्सव म्हणजे समाजप्रबोधनाचे व्यासपीठ होते. व्याख्याने, कीर्तन, नाटके, देशभक्तीपर कार्यक्रम आणि सामाजिक संदेश यामुळे हा उत्सव जनजागृतीचे प्रभावी माध्यम ठरला. स्वातंत्र्यानंतरही ही परंपरा सुरू राहिली; परंतु कालांतराने उत्सवाचे स्वरूप बदलत गेले. आज अनेक ठिकाणी गणेशोत्सव म्हणजे भव्य मंडप, लाखो रुपयांची सजावट, स्पर्धात्मक देखावे आणि प्रचंड आवाजातील डीजे यांचे प्रतीक बनले आहे. भक्तीपेक्षा दिखाऊपणा आणि सामाजिक प्रतिष्ठेची स्पर्धा अधिक दिसू लागली आहे. मोठ्या मूर्ती, झगमगाट आणि खर्चिक कार्यक्रम यांमुळे उत्सवाचे आध्यात्मिक स्वरूप मागे पडत आहे. उत्सव साजरा करण्यामागील मूळ हेतूसमाजाला आनंद आणि सकारात्मक ऊर्जा देणेहा अनेकदा विसरला जातो. ध्वनी प्रदूषण ही सध्याच्या उत्सवांपुढील सर्वात मोठी समस्या ठरत आहे. डॉल्बी, डीजे आणि अत्यंत मोठ्या आवाजातील ध्वनिक्षेपक यांमुळे वृद्ध, लहान मुले, रुग्ण, गरोदर महिला आणि विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागतो. अनेक संशोधनांनुसार अतितीव्र आवाजामुळे श्रवणशक्ती कमी होणे, रक्तदाब वाढणे, मानसिक ताण निर्माण होणे आणि हृदयविकाराचा धोका वाढू शकतो. उत्सवाचा आनंद दुसऱ्याच्या त्रासाचे कारण बनत असेल, तर त्याचा गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. यासोबतच पर्यावरणाचा प्रश्न अधिक गंभीर होत आहे. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती, रासायनिक रंग, प्लास्टिकची सजावट आणि विसर्जनामुळे होणारे जलप्रदूषण ही चिंतेची बाब आहे. नद्या आणि तलाव हे जीवनाचे स्रोत आहेत. त्यात विषारी रंग आणि अविघटनशील पदार्थ मिसळल्याने जलचर सृष्टीवर तसेच मानवी आरोग्यावरही परिणाम होतो. म्हणूनच शाडूच्या मातीच्या मूर्ती, नैसर्गिक रंग, निर्माल्यदान आणि कृत्रिम विसर्जन टाक्यांचा वापर यांसारखे पर्याय अधिक जबाबदार ठरतात. सार्वजनिक उत्सवांमध्ये रस्ते अडवणे, वाहतुकीला अडथळा निर्माण करणे आणि तासन्तास मिरवणुका काढणे यामुळे सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होते. एखादा रुग्ण रुग्णालयात पोहोचण्यास उशीर होणे किंवा विद्यार्थ्यांची परीक्षा बिघडणे, अशा घटना समाजाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात. श्रद्धा महत्त्वाची असली तरी ती इतरांच्या हक्कांवर अतिक्रमण करणारी नसावी. सणांचे वाढते व्यापारीकरण ही आणखी एक चिंतेची बाब आहे. प्रायोजकांचे मोठमोठे फलक, जाहिराती, स्पर्धा आणि प्रसिद्धीच्या हव्यासामुळे उत्सवाचा आत्मा हरवत चालला आहे. पूर्वी लोकवर्गणीतून उभे राहणारे उत्सव आज कोट्यवधी रुपयांच्या खर्चाचे प्रदर्शन बनताना दिसतात. या पैशाचा काही भाग शिक्षण, आरोग्य, वृक्षारोपण किंवा गरजूंना मदत यांसारख्या सामाजिक कार्यासाठी वापरला गेला, तर उत्सवाचे महत्त्व अधिक वाढेल. तथापि, याचा अर्थ सणांवर बंदी घालावी असा अजिबात नाही. सण ही आपल्या संस्कृतीची ओळख आहेत. ढोल-ताशांची परंपरा, आरत्या, भजन, कीर्तन, सामूहिक पूजा आणि सांस्कृतिक कार्यक्रम हे आपल्या समाजाचे सौंदर्य आहे. प्रश्न आधुनिक साधनांच्या वापराचा नाही; तर त्यांच्या अतिरेकाचा आहे. विज्ञानाने दिलेल्या तंत्रज्ञानाचा उपयोग समाजहितासाठी व्हावा, समाजाला त्रास देण्यासाठी नव्हे. यासाठी समाज, प्रशासन आणि उत्सव मंडळांनी संयुक्तपणे काही पावले उचलण्याची गरज आहे. डीजेमुक्त किंवा नियंत्रित ध्वनीमर्यादेतील उत्सव, शाडूच्या मातीच्या मूर्तींचा आग्रह, प्लास्टिकमुक्त सजावट, निर्माल्यदान, रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी, पुस्तक प्रदर्शन, पर्यावरण जनजागृती आणि गरजू विद्यार्थ्यांना मदत असे उपक्रम उत्सवांना अधिक अर्थपूर्ण बनवू शकतात. 'एक गाव-एक गणपती' किंवा 'एक गल्ली-एक गणपती' यांसारख्या संकल्पनाही खर्च आणि प्रदूषण कमी करण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात. सणांचे खरे सौंदर्य माणसाला जोडण्यात आहे, तोडण्यात नाही. गणेश म्हणजे बुद्धी, विवेक आणि मंगलतेचे प्रतीक.

# वरुड झोपलेले गाव : जागे होण्याची वेळ आली आहे

वरुड हे केवळ एक शहर नाही, तर हजारो नागरिकांच्या आशा-आकांक्षा, शेतकऱ्यांच्या कष्टांची कहाणी, व्यापाऱ्यांच्या मेहनतीची ओळख आणि तरुणांच्या स्वप्नांचे केंद्र आहे. काळ बदलत गेला, आजूबाजूची गावे आणि शहरे विकासाच्या दिशेने पुढे जात राहिली; मात्र वरुडच्या विकासाचा वेग अपेक्षेइतका वाढला का, हा प्रश्न आज प्रत्येक जागरूक नागरिकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. म्हणूनच आज 'वरुड झोपलेले गाव' असे म्हणावेसे वाटते. ही टीका नाही, तर आत्मपरीक्षणाची आणि जागृतीची गरज आहे.




वरुडला निसर्गाने आणि भौगोलिक परिस्थितीने अनेक संधी दिल्या आहेत. शेती हा या परिसराचा कणा आहे. संत्री उत्पादक शेतकरी, कापूस, सोयाबीन आणि इतर पिकांवर अवलंबून असलेली ग्रामीण अर्थव्यवस्था, शहरातील व्यापारी वर्ग, छोटे-मोठे व्यावसायिक आणि सेवा क्षेत्र यामुळे वरुडमध्ये आर्थिक क्षमता मोठी आहे. परंतु या क्षमतेचे नियोजनबद्ध रूपांतर विकासात करण्याची गरज आहे.

आज शहरातील अनेक प्रश्न वर्षानुवर्षे चर्चेत आहेत. रस्त्यांची अवस्था, वाहतुकीची कोंडी, अतिक्रमण, स्वच्छता, नाल्यांची समस्या, पिण्याचे पाणी, सार्वजनिक सुविधांची कमतरता, शहराचे वाढते प्रदूषण आणि नियोजनाचा अभाव अशा अनेक प्रश्नांवर नागरिकांमध्ये नाराजी आहे. समस्या नवीन नाहीत; नवीन आहे ती त्याकडे पाहण्याची आपली उदासीनता.

**विकासासाठी केवळ प्रशासनाला दोष देऊन चालणार नाही**

शहराचा विकास करण्याची जबाबदारी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींची निश्चितच आहे. नागरिकांनी त्यांच्याकडून प्रश्न विचारले पाहिजेत, कामांचा जाब मागितला पाहिजे आणि विकासकामांमध्ये पारदर्शकता असावी, अशी मागणी केली पाहिजे. मात्र त्याचबरोबर नागरिकांनीही आपली जबाबदारी स्वीकारली पाहिजे. रस्त्यावर कचरा टाकून नंतर स्वच्छतेची मागणी करणे, अतिक्रमण करून वाहतुकीच्या समस्येवर नाराजी व्यक्त करणे किंवा सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करून शहराच्या विकासाची अपेक्षा करणे, ही मानसिकता बदलण्याची गरज आहे.

**तरुणाई ही वरुडची खरी ताकद**

वरुडमध्ये शिक्षित आणि उत्साही तरुणांची संख्या मोठी आहे. अनेक तरुण शिक्षण, नोकरी, व्यवसाय आणि विविध क्षेत्रांत आपली ओळख निर्माण करीत आहेत. मात्र स्थानिक पातळीवर रोजगाराच्या आणि उद्योगांच्या पुरेशा संधी निर्माण झाल्या नाहीत, तर हीच तरुणाई मोठ्या शहरांकडे वळत राहील.

स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन, लघुउद्योगांसाठी सुविधा, कौशल्यविकास, डिजिटल व्यवसाय, कृषी प्रक्रिया उद्योग आणि शेतमालावर आधारित उद्योग उभे राहिले, तर वरुडच्या अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळू शकते. संत्रा उत्पादक परिसर म्हणून वरुडची ओळख आहे; या ओळखीचा उपयोग प्रक्रिया उद्योग, पॅकेजिंग, साठवणूक आणि बाजारपेठेशी थेट जोडणीसाठी करता आला, तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही वाढ होऊ शकते.

**शेतकऱ्यांचा प्रश्नही शहराच्या विकासाशी जोडलेला आहे**

वरुडची बाजारपेठ आणि ग्रामीण भाग यांचे नाते अतूट आहे. शेतकरी सक्षम झाला तर बाजारपेठ मजबूत होते आणि बाजारपेठ मजबूत झाली तर शहराची अर्थव्यवस्था वाढते. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी चांगले रस्ते, शेतमाल वाहतुकीच्या सुविधा, साठवणूक केंद्रे, बाजारपेठेचे नियोजन आणि योग्य दर मिळवून देण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. पानंद रस्ते, ग्रामीण रस्ते, सिंचन व्यवस्था आणि कृषी क्षेत्रातील आधुनिक सुविधा याकडे केवळ ग्रामीण प्रश्न म्हणून न पाहता संपूर्ण वरुडच्या आर्थिक विकासाचा भाग म्हणून पाहिले पाहिजे.

**शहर सुंदर करण्यासाठी फक्त मोठ्या योजना नकोत**

वरुड शहराचा विकास म्हणजे केवळ मोठ्या इमारती, सिमेंटचे रस्ते किंवा एखादा मोठा प्रकल्प नव्हे. स्वच्छ आणि सुरक्षित रस्ते, व्यवस्थित वाहतूक, पुरेशी पार्किंग व्यवस्था, चांगली पथदिव्यांची सुविधा, स्वच्छ नाले, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक शौचालये, उद्याने आणि नागरिकांसाठी मोकळी जागा यांनाही तितकेच महत्त्व आहे. शहर सुंदर करण्याची सुरुवात छोट्या गोष्टींपासून होते. प्रत्येकाने आपला परिसर स्वच्छ ठेवणे, वाहतुकीचे नियम पाळणे आणि सार्वजनिक जागेचा योग्य वापर करणे आवश्यक आहे.

'माझे वरुड' ही भावना निर्माण झाली पाहिजे शहराचा विकास तेव्हाच शक्य होतो, जेव्हा नागरिकांच्या मनात शहराबद्दल आपलेपणा निर्माण होतो. हे प्रशासनाचे काम आहे, हे नगरपालिकेचे काम आहे, ङ्कमाझ्यामुळे काय फरक पडणार? अशी मानसिकता सोडण्याची वेळ आली आहे.

एखादा नागरिक प्रश्न उपस्थित करतो, दुसरा त्याला पाठिंबा देतो, तिसरा प्रशासनाकडे पाठपुरावा करतो आणि चौथा सकारात्मक कामात सहभागी होतो, तेव्हा शहर बदलण्यास सुरुवात होते.

**आता झोपेतून जागे होण्याची गरज**

'वरुड झोपलेले गाव' हा शब्द ऐकायला कदाचित कठोर वाटेल; पण त्यामागचा प्रश्न गंभीर आहे. आपल्याकडे क्षमता असूनही आपण तिचा पूर्ण उपयोग करीत आहोत का? आपल्या पुढच्या पिढीसाठी आपण चांगले शहर उभे करीत आहोत का? तरुणांना इथेच संधी मिळतील का? शेतकऱ्यांच्या कष्टाला योग्य बाजारपेठ मिळेल का? शहरातील मूलभूत सुविधा काळानुसार सुधारतील का?


**या प्रश्नांची उत्तरे आज शोधली नाहीत तर उद्या उशीर होऊ शकतो.**

वरुडला जागे करण्यासाठी मोठ्या घोषणांची गरज नाही. नियोजन, सातत्य, पारदर्शकता, नागरिकांचा सहभाग आणि विकासाची स्पष्ट दिशा यांची गरज आहे. राजकीय मतभेद बाजूला ठेवून शहराच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र येणे आवश्यक आहे.वरुडमध्ये क्षमता आहे, मेहनती माणसे आहेत, तरुणाई आहे, व्यापारी वर्ग आहे, शेतकरी आहेत आणि विकासाची मोठी संधी आहे. गरज आहे ती या सर्व शक्तींना एका दिशेने घेऊन जाण्याची.

वरुड झोपलेले नाही; वरुडला फक्त जागे करण्याची गरज आहे. आज प्रश्न एवढाच आहेआपण वरुडला जागे करण्यासाठी पुढे येणार आहोत का? कारण उद्याचे वरुड कसे असेल, हे केवळ प्रशासन ठरवणार नाही; ते आपण सर्व मिळून ठरवणार आहोत.

# दिमागी नक्षलींचे कुळ आणि मूळ

राज्याचे तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील म्हणाले होते, की जंगलात दडून बसलेल्या नक्षलवाद्यांचे खरे सूत्रधार शहरातच आहेत. नक्षलवाद्यांना लागणारी सर्व रसद, पैसा आणि शस्त्रे शहरांमधूनच पुरवली जातात. नक्षलवाद्यांच्या सूत्रधारांना पकडण्यासाठी कायदे कमी पडतात.




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्य दिनानिमित्ताने लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात देशातील काही व्यक्ती, शक्ती नक्षली बुद्धीच्या आहेत (दिमागी नक्षली) असा उल्लेख केला. त्यामुळे अनेकांच्या अंगाचा तीळपापड होऊ लागला आहे. अरविंद केजरीवाल, पी. चिदंबरम यासारख्या नेत्यांनी आम्ही नक्षली आहोत आणि आम्हाला त्याचा अभिमान आहे, अशा अर्थाचा उल्लेख असणाऱ्या पोस्ट समाजमाध्यमांवर प्रसिद्ध होत आहेत. याचाच अर्थ पंतप्रधानांनी केलेला उल्लेख या मंडळींना चांगलाच खुपला आहे.

भारतात नक्षलवाद्यांचा उदय कसा झाला आणि त्यांनी केलेल्या हिंसाचारात हजारो निरपराध व्यक्तींचे बळी कसे गेले याची माहिती नव्या पिढीला नाही. म्हणूनच नक्षलवादामुळे देशाला किती मोठे नुकसान सहन करावे लागले आहे, याची माहिती सध्याच्या 'जेन झी'ला देणे आवश्यक आहे. सध्याच्या 'जेन झी'ला पाकिस्तानातून आलेल्या दहशतवाद्यांनी देशात २००४ ते २०१४ कसा धुमाकूळ घातला होता याचीही कल्पना नाही. अत्यंत सुरक्षित वातावरणात, प्रगत तंत्रज्ञानाच्या काळात सध्याची 'जेन झी' वाढली आहे. आपण कळते होण्याच्या अगोदर सोनिया आणि राहुल गांधींच्या राज्यात, देशात नक्षलवांद्याचे आणि पाकिस्तानी दहशतवाद्यांचे राज्य होते, याची माहिती नसलेल्या 'जेन झी'ला नक्षलवादाचा थोडक्यात इतिहास कळलाच पाहिजे. नक्षलवादाचा उदय सरकारी यंत्रणेच्या अत्याचाराविरोधात आणि जमीनदार, सावकार यांच्या दडपशाहीविरोधात झाला होता. नक्षलवाद्यांनी सरकारी यंत्रणा आणि प्रस्थापितांविरोधात सशस्त्र उठाव करण्यास प्रवृत्त केले. त्यामुळे पश्चिम बंगाल, ओदिशा, झारखंड, तेलंगणा, छत्तीसगड, महाराष्ट्र अशा अनेक राज्यांत सशस्त्र नक्षलवाद्यांनी निरपराध सामान्यांचे आणि पोलीस कर्मचाऱ्यांचे बळी घेतले. पोलीस, सरकारी कर्मचारी, जमीनदार अत्याचार करीत असतील तर त्याविरोधात दाद मागण्याचा कायदेशीर मार्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाने उपलब्ध करून दिला आहे. मात्र त्यावर नक्षलवाद्यांचा विश्वास नाही. २००४ ते २०१४ या काळात नक्षलवाद आणि दहशतवाद उच्चांकी स्तरावर पोहचला होता. मनमोहन सिंग सरकार असताना नक्षलवाद्यांच्या हिंसाचारात हजारो जण ठार झाले. छत्तीसगढमध्ये २५ मे २०१३ रोजी माओवाद्यांनी केलेल्या बॉम्बस्फोटात आणि गोळीबारात ज्येष्ठ काँग्रेस नेते विद्याचरण शुक्ल यांच्यासह २७ जण ठार झाले. त्याआधी २०१० मध्ये छत्तीसगढमध्येच नक्षलवाद्यांनी केलेल्या बॉम्बस्फोटात केंद्रीय सुरक्षा दलाचे ७६ जवान ठार झाले होते. अशा अनेक घटना त्या काळात घडल्या. मात्र त्यावेळच्या मनमोहन सिंग सरकारने नक्षलवाद्यांच्या विरोधात कडक कारवाई केली नाही. २०१४ मध्ये मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर नक्षलवाद्यांविरोधात कडक कारवाई सुरू झाली. त्यामुळे नक्षलवादी शक्तींनी जंगलातून पळ काढत शहरांना आपले लक्ष्य केले. विविध जाती-जमातींत अफवा गैरसमज पसरवून दंगे घडविणे हे शहरी भागातील नक्षलवाद्यांचे उद्दिष्ट होते. २०१८ मध्ये भीमा-कोरेगाव येथे झालेला हिंसाचार आणि नवी मुंबईत पोलिसांवर झालेली दगडफेक, जाळपोळ ही शहरी नक्षलवाद्यांच्या कारवायांची मोठी उदाहरणे आहेत. नवी दिल्लीत शाहिनबाग आंदोलनावेळी अनेक दिवस रस्ते अडविण्यात आले. त्यानंतर दिल्लीत दंगल झाली, यात प्रमुख आरोपी होता आम आदमी पक्षाचा नगरसेवक ताहीर हुसेन. विद्यार्थी आंदोलनात पोलिसांनी संसदेवर मोर्चा काढण्यास परवानगी दिली नसताना मोर्चा काढला गेला, अनेक पोलिसांना मारहाण केली गेली, पोलिसांच्या अनेक वाहनांचे नुकसान केले गेले. पोलिसांनी आंदोलकांवर गोळीबार करावा असाच उद्देश दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनात घुसलेल्या नक्षलवादी शक्तींचा होता. मोदी सरकारविरुद्ध आंदोलन करून हिंसाचार व्हावा अशा पद्धतीने आंदोलने करणे हाच नक्षली शक्तींचा सध्याचा हेतू आहे. त्यामुळेच केजरीवाल, चिदंबरम यांच्यासारख्यांना पंतप्रधान मोदीजींच्या वक्तव्यांमुळे मिरची लागली.

'होय, मी नक्षली आहे,' असे आज म्हणणारे चिदंबरम केंद्रीय गृहमंत्री असताना शहरी नक्षलवाद हे देशापुढील सर्वात मोठे संकट असल्याचे म्हणत होते. चिदंबरम यांच्यानंतर केंद्रीय गृहमंत्री झालेले सुशिलकुमार शिंदे यांनीही शहरी नक्षलवादाचा धोका मोठा असल्याचे सांगितले होते. नोव्हेंबर २०१३ मध्ये डॉ.मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील सरकारने सर्वोच्च न्यायालयात शपथपत्र दाखल करून शहरी नक्षलवादी देशापुढचे संकट असल्याचे नमूद केले होते. शहरी नक्षलवादी हे वेगवेगळ्या संघटनांच्या माध्यमातून काम करीत असून त्यांचा संबंध भारतीय कम्युनिस्ट पक्षाशी (माओवादी) असल्याचे मनमोहन सिंग सरकारने शपथपत्रात म्हटले होते. मानवी हक्काच्या नावाखाली काम करणाऱ्या संघटना शहरी नक्षलवाद्यांशी संबंधित असल्याचे त्या शपथपत्रात म्हटले होते. याबाबत पी. चिदंबरम यांनी केलेली वक्तव्ये आजही यूट्यूबवर उपलब्ध आहेत. केंद्रातील सत्तेत असताना ज्या नक्षलींना चिदंबरम हे देशापुढील संकट म्हणत होते ते चिदंबरम आज नक्षली असल्याचा मला अभिमान आहे, असे म्हणू लागले आहेत.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# क्रीडांगणे व क्रीडा ही शारीरिक-मानसिक सौष्ठवाची प्रभावी साधने : प्राचार्य डॉ.दिगांबर कापसे

## समर्थ महाविद्यालय लाखनी येथे राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**लाखनी** – स्थानिक राष्ट्रीय शिक्षण संस्था संचलित समर्थ महाविद्यालय, लाखनी येथे शारीरिक शिक्षण विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.दिगांबर कापसे होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्रा.डॉ.धनंजय गिरीपुंजे व प्रा.सुरेश केदार उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.कापसे यांनी सांगितले की, प्राचीन काळापासून मानवाने शारीरिक व मानसिक स्वास्थ्याला विशेष महत्त्व दिले आहे. शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम व्यक्तीच जीवनात प्रगती करू शकते. मात्र, सध्याच्या युगात क्रीडांगणे व क्रीडा प्रकारांकडे होत असलेल्या दुर्लक्षामुळे तरुण पिढी शारीरिक व मानसिकदृष्ट्या कमकुवत होत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे क्रीडांगणे व क्रीडेला प्राधान्य देऊन त्याद्वारे शारीरिक व मानसिक सौष्ठव प्राप्त करण्याचे आवाहन त्यांनी केले.

प्रा.डॉ.धनंजय गिरीपुंजे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना खेळाडूंनी शिस्त, समर्पण आणि सातत्य या गुणांच्या बळावर यश संपादन करावे, असे सांगितले. प्रा. सुरेश केदार यांनीही क्रीडेचे व्यक्तिमत्त्व विकासातील महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे संचालन डॉ.बंडू चौधरी यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ.युवराज जांभुळकर यांनी मानले.

याप्रसंगी प्रा.लालचंद मेश्राम, प्रा.राम कोटांगले, डॉ.संदीप सरया, प्रा.वंजारी, प्रा.अशोक गायधनी, डॉ.सुरेश बनसपाल, डॉ.भास्कर पर्वते, डॉ.सुनंदा देशपांडे, डॉ.संगीता हाडगे, प्रा.रूपाली खेडेकर, प्रा. वैशाली नंदेश्वर यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.एम.डी.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६६१/२०२६ ने.ता.१६/०९/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती कविता किशोरराव ठाकरे, वय अं.३९ वर्ष, धंदा-गृहीणी, २) कु.दिक्षा किशोर ठाकरे, वय अं.१७ वर्ष, धंदा-शिक्षण, ३) कु.श्वेता किशोर ठाकरे, वय अं.१६ वर्ष, धंदा-शिक्षण, ४) श्रीमती बेबी ईश्वर ठाकरे, वय अं.६० वर्ष, धंदा-गृहीणी, (अर्जदार क्र.१ ही स्वत: करीता व अ.पा.क. आई म्हणुन अर्जदार क्र.२ व ३ करीता) अर्जदार क्र.१ ते ४ रा.धनोडी

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत किशोर ईश्वरराव ठाकरे, रा.धनोडी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१६/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख ०५/०८/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६७५/२०२६ ने.ता.२४/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) कुमुद सुरेश तरार, वय अं.६६ वर्ष, धंदा-घरकाम

२) सागर सुरेशराव तरार, वय अं.३७ वर्ष, धंदा- शेती

रा.माता चौक, शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत सुरेश पांडुरंग तरार, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२४/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख १९/०८/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# भाजप वाढविण्यापासून महाराष्ट्र घडविण्या पर्यंत एकनाथ खडसेंचे मोठं योगदान

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – एकनाथ खडसे हे झुंजार नेते आहेत. महाराष्ट्रात भारतीय जनता पक्ष वाढण्यामध्येच नव्हे तर सामाजिक कार्यासह महाराष्ट्र घडविण्यात एकनाथ खडसे यांचं मोठे योगदान राहिल्याचं सांगत मंत्री चंद्रकाश्नंत पाटील यांनी, शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते एकनाथ खडसे यांना त्यांच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने शुभेछा दिल्या आहेत. एकनाथ खडसे यांचा उद्या अमृत महोत्सव सोहळा पार पडत आहे. या वेळी पुण्यात आपल्याच मतदारसंघात दुसरा कार्यक्रम असल्याने, उद्या खडसे यांच्या अमृत महोत्सवास आपल्याला उपस्थित राहता येणार नाही.

त्यामुळे आपण खडसे यांना आजच शुभेच्या देण्यासाठी मुक्ताईनगर येथे आलोय. यावेळी त्यांच्या निरोगी आयुष्यासाठी आणि त्यांच्या पुढील वाटचालीसाठी आपण त्यांना शुभेच्या देत असल्याचं उच्च तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकातदादा पाटील यांनी म्हटलंय.



### टी.सी.हरविल्याबाबत

माझी सन २०११-२०१२ मध्ये दिलेल्या बारावीच्या परिक्षेची टी.सी. (शाळा सोडल्याचा दाखला) अनावधानाने १० ऑगस्ट २०२६ रोजी हरविली असून कुणाला आढळून आल्यास माझेशी संपर्क साधावा.

कु.सुलताना देविराम युवनाते
रा.पंढरी ता.वरुड, जि.अमरावती
मोबा.९१४६४२११९४

# भाजपकडून 'झूट की गूंज' वेबसाइटचा दाखला : राहुल गांधींवर तरुणांची दिशाभूल केल्याचा आरोप

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या 'छात्रों की गूंज' (विद्यार्थ्यांचा आवाज) या अभियानादरम्यान त्यांनी केलेल्या विधानांची तथ्य-तपासणी (फॅक्ट-चेक) करणाऱ्या एका वेबसाइटचा दाखला देत भारतीय जनता पक्षाने (भाजप) गुरुवारी त्यांच्यावर जोरदार निशाणा साधला. राहुल गांधी देशातील तरुणांची दिशाभूल करत असून, आता त्यांच्या प्रत्येक 'असत्याला' सत्याच्या आणि तथ्यांच्या आधारे उत्तर दिले जाईल, असे भाजपने म्हटले आहे. शॉक ट्रिटमेंट भाजपने आपल्या प्रवक्त्यांच्या फौजेला मैदानात उतरवत राहुल गांधींवर चौफेर हल्ला चढवला. राहुल यांची विधाने ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दलच्या 'नैराश्यातून आणि मत्सरातून' येत असल्याचे त्यांनी सांगितले. या नेत्यांनी 'झूट की गूंज' नावाच्या वेबसाइटचा उल्लेख राहुल गांधी यांच्या अभियानाची 'शॉक ट्रिटमेंट' असा केला असून, आपल्या 'एक्स' अकाऊंटवरून या वेबसाइटची लिंकही शेअर केली आहे. नरेंद्र मोदी यांच्याबद्दलच्या मत्सर आणि नैराश्यातून राहुल गांधी हे असत्याचे झेंडेधारक बनले आहेत. त्यांनी कितीही असत्य पसरवले, तरी आता प्रत्येक खोटेपणा तथ्यांच्या आधारे उघडा पाडला जात आहे. 'झूट की गूंज' ही वेबसाइट गांधी यांच्या दाव्यांची पोलखोल करत आहे.

## ऑपरेशन कवच अंतर्गत एचकेएम उर्दू हायस्कूलच्या

# विद्यार्थ्यांनी तयार केले अतिशय सुंदर पोस्टर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – अमरावती ग्रामीण पोलीस विभागाद्वारा ऑपरेशन कवच अंतर्गत अमली पदार्थविरोधी जनजागृतीसाठी पोस्टर निर्मिती करिता शालेय विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात आले होते. त्यास अनुसरुन एच.के.एम.उर्दू हायस्कूल वरुड येथील विद्यार्थ्यांनी पोस्टर निर्मिती स्पर्धेत हिरीरेने भाग घेऊन उत्स्फूर्त सहभाग नोंदवून अतिशय सुंदर असे पोस्टर तयार केले. त्यामध्ये अमली पदार्थाचे दुष्परिणाम, नशामुक्त जीवनाचे फायदे, युवकांसाठी सकारात्मक संदेश, समाजाचा बदलाचा संदेश असे अनेक महत्त्वाचे संदेश या पोस्टर निर्मितीमध्ये देण्यात आले. या चित्राचे परीक्षण विद्यालयाचे मुख्याध्यापक अब्दुल शकील यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षक नईम शेख जरुडकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.माधवराव पानसे विद्यालयाचे कलाशिक्षक विष्णू सालपे यांनी केले.

यामध्ये प्रथम क्रमांक इयत्ता नववीच्या हजिरा आफरीन मोहम्मद नईम शेख, द्वितीय अंजीला सदफ मोहम्मद अनीस तर तृतीय क्रमांक अब्दान आदिलअब्दुल कलीम या विद्यार्थीनींने प्राप्त केला. विद्यालयामधून अक्सा फातेमा मोहम्मद अश्फाक, जुबिया कौसरअशपाकुल्ला खान, तंजिला फिरदोस इनायात खा या विद्यार्थिनींनीही प्रोत्साहनपर बक्षीस प्राप्त केले. पोस्टर्स स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना विद्यालयातर्फे प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. स्पर्धेच्या आयोजनामध्ये विद्यालयातील मिर्झा शहजाद अख्तर, सय्यद सादिक अली, नईम अहमद, फरदा यास्मिन, अब्दुल कलीम, तौफिक अहमद, नाजीम खान यांचे सहकार्य लाभले.



# न्यू आॅरेंज सिटी कॉन्व्हेंटमध्ये पालक शिक्षक सभा उत्साहात संपन्न

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – न्यू आॅरेंज सिटी कॉन्व्हेंटमध्ये शैक्षणिक सत्र २०२६-२७ करिता पालक शिक्षक संघाची पहिली सर्वसाधारण सभा पार पडली.

या सभेत पालक शिक्षक संघाच्या कार्यकारिणी समितीची निवड ईश्वरचिठ्ठीने करण्यात आली. वर्ग निहाय पालक प्रतिनिधी निवडण्यात आले. वर्ग पहिली तुकडी अ, ब, क, ड, ई याकरिता सचिन आंडे, गिरीश घोरमाडे, प्रवीण कराळे, पुनम नारंगे, राजेंद्र वसुले, वर्ग दुसरी अ, ब, क, ड, ई तुकडी करिता भाग्यश्री बहुरूपी, पूजा गावंडे, काजल कुकडे, प्रणव वरखेडकर, तुषार सोनारे, वर्ग तिसरी अ, ब, क, ड, ई, एफ तुकडी करिता पल्लवी भोयर, रूपाली डाखोरे, धनश्री काळे, अमित कुबडे, भारती शामकुमार राजेश, कल्याणी शेगेकर, वर्ग चौथी, अ, ब, क, ड, ई करिता किर्ती देशमुख, मनोज गेडाम, चंद्रशेखर खंडार, दीपल पटेल, शितल वानखडे वर्ग पाचवी अ, ब, क, ड, ई करिता निलेश चरोडे, चेतना गणोरकर, मनीष लोखंडे, विद्या पानसे, विशाखा यावले वर्ग सहावी अ ब क ड ई करिता प्रणिता बेलसरे, माधुरी गावंडे, राहुल लोखंडे, ललित साबळे, अश्विनी वाघमारे, वर्ग सातवी अ, ब, क, ड, ई करिता अभिजीतसिंग चव्हाण, चंचल घोरपडे, प्रशांत खापरे, इजाज पठाण, आचल यावलकर वर्ग आठवी अ, ब, क, ड करिता किशोरी भाकरे, गणेश सातपुते, प्रियंका कोसे, प्रेमसुख ठोंबरे, वर्ग नववी अ, ब, क, ड करिता प्रशांत चरडे, भोजराज पांडे, कल्पना सव्वालाखे, उज्वला साबळे वर्ग दहावी अ, ब, क, ड करिता धनराज बमनोटे अरुण जारी, पंढरी डबरासे, तनुजा वानखडे, नर्सरी करिता वृंदा पोतदार, के.जी.वन ए ,बी करिता प्रांजली देशमुख, मृणाली वसु , के.जी. टू ए, बी करिता अमोल बेले, अजित कुमार सोनारे यांची पालक प्रतिनिधी म्हणुन निवड करण्यात आली तर शिक्षक प्रतिनिधी म्हणुन प्रत्येक तुकडीच्या वर्ग





शिक्षकांची निवड झाली. पालक शिक्षक संघाच्या अध्यक्ष म्हणुन प्राचार्य माधुरी भोंडे, उपाध्यक्ष अमित कुबडे, सचिव सविता आंडे, सहसचिव गिरीश घोरमाडे व शाळेच्या समन्वयक श्वेता गणोरकर यांची निवड करण्यात आली.

या प्रथम सभेत पालक शिक्षक संघाची कर्तव्य उद्देश तसेच कार्यप्रणाली विषद करण्यात आली. संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ.राम गोधने, माजी अध्यक्ष गोपाल वानखडे, उपाध्यक्ष सुधाकर ठाकरे, सचिव अनिल गुल्हाने, सहसचिव शाम खंडेलवाल, कोषाध्यक्ष डॉ.वेदांत राजोरिया, सदस्य विनय यावलकर विभाग प्रमुख किशोर देशमुख, पराग भोंडे आदी मान्यवरांनी पालक शिक्षक संघाच्या नवनिर्वाचित पदाधिकारी व पालक प्रतिनिधींचे अभिनंदन करून पुढील वाटचाली करीता शुभेच्छा दिल्या.

## हे नाते असेच जपत राहूया... प्रेम, विश्वास आणि संरक्षणाची ही डोरी कधीही न तुटणारी ठरो!


सई श्रीकृष्ण आकांत, कृष्णाई पंकज आकांत, आराध्य पंकज आकांत



प्रणय डाफे आणि प्राची रुमाले


यज्ञेश राहुल देशमुख, जानवी राहुल देशमुख


दिपाली काळे, रोषण वानखडे


कृष्णाई रविंद्र लव्हाळे, उत्कर्ष सुरेश लव्हाळे


सिध्दी उईके, भावेश उईके, ऋषिकेश उईके, महेश उईके


जयेश धांडे आणि मनस्वी धांडे


ऋत्वा हर्षल पांडे आणि यजूर्व हर्षल पांडे


अक्षय मालपे आणि अंकिता डेहनकर यांचे कडील रक्षाबंधन

# ‘सिप्ला’च्या पुणे युनिटचा विक्री परवाना रद्द

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**मुंबई** – महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने सिप्ला फार्मा अँड लाइफ सायन्सेस लिमिटेडच्या पुण्यातील कॅरी अँड फॉरवर्डिंग युनिटचा औषध विक्री परवाना रद्द केला आहे. रियॅक्टिन टॅब्लेट प्लस या औषधाच्या पॅकेजिंग, साठवणूक आणि बाजारातून परत मागवण्याच्या प्रक्रियेत गंभीर अनियमितता आढळल्याने ही कारवाई करण्यात आली. २७ ऑगस्टपासून परवाना रद्द करण्याचा आदेश लागू झाला आहे. पुणे जिल्ह्यातील वडकी येथील कंपनीच्या मुख्य गोदामाची तपासणी केल्यानंतर प्रशासनाने ही कारवाई केली. तपासणीदरम्यान औषधे थेट जमिनीवर ठेवण्यात आल्याचे तसेच मुदतबाह्य औषधांच्या हाताळणीसंदर्भातील प्रक्रियेत त्रुटी असल्याचे आढळून आले.

# बड्या मराठा नेत्यांकडे ओबीसी प्रमाणपत्रे : विजय वडेट्टीवार यांचा आरोप

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नागपूर** – अनेक ज्येष्ठ मराठा नेत्यांनी इतर मागासवर्गीय श्रेणीचे प्रमाणपत्र मिळवले असल्याचा खळबळजनक दावा काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

या वक्तव्यात त्यांनी सुरुवातीला राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरदचंद्र पवार गट) खासदार सुप्रिया सुळे यांच्या नावाचाही उल्लेख केला होता. मात्र, सुप्रिया सुळे यांनी पुरावे सादर करण्याचे थेट आव्हान दिल्यानंतर वडेट्टीवार यांनी तात्काळ ‘अनावधानाने नाव आले’ असे म्हणत खेद व्यक्त केला आणि आपले वक्तव्य मागे घेतले.

एका राज्यमंत्र्याने ओबीसी प्रमाणपत्र मिळवल्याचा आरोप ओबीसी कार्यकर्ते लक्ष्मण हाके यांनी केला होता. याबाबत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना वडेट्टीवार म्हणाले, महाराष्ट्रातील जवळपास ९० टक्के म्हणजेच निम्मा मराठा समाज ओबीसी प्रमाणपत्र घेऊन बसला आहे. मनोज जरांगे यांना कदाचित माहिती नसेल, पण सुप्रिया सुळेंपासून अनेक मोठ्या मराठा नेत्यांकडे ओबीसी प्रमाणपत्रे आहेत. आता ओबीसी सामान्य वर्ग आणि इतर वर्ग ओबीसी श्रेणीत येत असल्यासारखी स्थिती निर्माण झाली आहे.

सगळेच २७ टक्के ओबीसी आरक्षणाचा लाभ घेण्याचा प्रयत्न करत आहेत. सुप्रिया सुळेंचे प्रत्युत्तर विजय वडेट्टीवार यांच्या या आरोपावर खासदार सुप्रिया सुळे यांनी एक्सवर पोस्ट करत कडक शब्दांत संताप व्यक्त केला.

विजय वडेट्टीवार यांनी माझ्याकडे ओबीसी प्रमाणपत्र असल्याचा निव्वळ खोटा आरोप केला आहे. त्यांना ही माहिती कोणी आणि कोणत्या आधारावर दिली, हे त्यांनी जाहीर करावे.

# डीलिमिटेशनबाबत सर्वपक्षीय बैठक घ्या : खर्गेंचे मोदींना पत्र

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून परिसीमनाबाबत सरकारची नक्की काय योजना आहे, हे सर्व राजकीय पक्षांसमोर स्पष्ट करण्याची मागणी केली आहे. काँग्रेस अध्यक्षांनी मोदींना सर्वपक्षीय बैठक बोलावण्याचे आणि राज्य सरकारे व सर्व राजकीय पक्षांना परिसीमनाच्या प्रस्तावांचा सखोल अभ्यास करण्यासाठी पुरेसा वेळ देण्याचे आवाहनही केले आहे.

लोकसभेतील सध्याची ५४३ ही सदस्यसंख्या पुढील २५ वर्षांसाठी आहे तशीच गोठवण्यात यावी आणि २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपासून महिलांसाठी एक-तृतीयांश (३३ टक्के) आरक्षण लागू करण्यात यावे, अशी आग्रही मागणी खर्गे यांनी केली आहे.

खर्गे यांनी पत्रात नमूद केले की, त्यांनी यापूर्वी १६ जुलै रोजीही पंतप्रधानांना परिसीमन प्रस्तावांवर चर्चा करण्यासाठी सर्वपक्षीय बैठक आयोजित करण्याचे पत्र लिहिले होते. संसदीय कामकाज मंत्र्यांनी एका दूरचित्रवाणी मुलाखतीत संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले जाऊ शकते, असे सूतोवाच केल्यामुळे त्यांनी पुन्हा या मागणीचा पुनरुच्चार केला आहे. मान्सून अधिवेशन अद्याप औपचारिकपणे अनिश्चित काळासाठी स्थगित न करण्यामागे हेच कारण असावे, असा संशयही त्यांनी व्यक्त केला.

# अमडापुर येथील स्मशाभुमीचे पालटले स्वरुप

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## भागवत सप्ताह समितीच्या कार्यकर्त्यांच्या अनेक महिन्यांच्या कार्याला यश





**वरुड** – अमडापुर येथील स्मशानभुमीचे स्वरुप पालटले असुन भागवत सप्ताह समितीच्या कार्यकर्त्यांच्या अनेक महिन्यांच्या कार्याला यश मिळाले आहे. परिसरात श्री शंकर भगवान यांच्या मुर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात संपन्न झाला.

भागवत सप्ताह समितीच्या कार्यकर्त्यांनी गेल्या अनेक महिन्यांपासून घेतलेल्या अथक परिश्रमांना या सोहळ्याच्या निमित्ताने मोठे यश आले असून, संपूर्ण स्मशानभुमीचे स्वरुप आता पालटले आहे. एक रविवार गावासाठी उपक्रमातुन श्रमदान व लोकवर्गणीगावातील तरुणांनी सामाजिक भान जपण्यासाठी 'एक रविवार गावासाठी' हा कौतुकास्पद उपक्रम सुरु केला आहे. या अंतर्गत गावातील सर्व तरुण प्रत्येक रविवारी स्मशानभूमी परिसरात एकत्र येऊन श्रमदान करतात. त्यांच्या या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आणि लोकवर्गणीच्या माध्यमातूनच आज या परिसराचा संपूर्ण कायापालट झाला आहे. या धार्मिक आणि सामाजिक कार्यासाठी गावातील एका भगिनीने मुर्तीसाठी ४१ हजार रुपयांची सढळ हाताने वर्गणी दिली तसेच मूर्तीच्या ओट्याच्या बांधकामासाठी बाहेरगावी राहणाऱ्या गावकऱ्यांनी आणि स्थानिक ग्रामस्थांनी एकत्र येत निधी गोळा करुन सहकार्य केले.

याशिवाय आपल्या पुर्वजांच्या स्मृतिप्रित्यर्थ ग्रामस्थांनी परिसरात बसण्यासाठी सुमारे ४० बेंचेसची (बाकडी) व्यवस्था केली आहे. भव्य मिरवणुक आणि महिलांची मोठी उपस्थिती मुर्ती प्राणप्रतिष्ठेनिमित्त स्थानिक श्री हनुमान मंदिरापासून भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. या मिरवणुकीत गावातील भजनी मंडळी, ज्येष्ठ नागरिक आणि तरुण वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. शाळकरी विद्यार्थ्यांच्या लेझिम पथकाचे सादरीकरण मिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरले. या धार्मिक सोहळ्याला शेकडो महिला भाविकांनी उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घेतला.

हजारो भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजनमूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा आणि धार्मिक विधी संपन्न झाल्यानंतर भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या महाप्रसादाचा लाभ गावातील तसेच परिसरातील हजारो भाविक, महिला आणि नागरिकांनी अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात घेतला. या निमित्ताने संपूर्ण अमडापुर परिसरात आनंदाचे आणि भक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. सामाजिक बांधिलकी ९१ जणांचे रक्तदान उत्सवाचे औचित्य साधून येथे भव्य रक्तदान शिबिर घेण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत गावातील सुमारे ९१ भाविकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करुन राष्ट्रीय कार्यात खारीचा वाटा उचलला. रक्तदात्यांच्या या दातृत्वाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

खासदार अमर काळे यांची प्रमुख उपस्थिती होते. त्यांनी तरुणांच्या श्रमदानाचे आणि गावकऱ्यांच्या सामुहिक एकीचे विशेष कौतुक केले तसेच नागरिकांची अडचण लक्षात घेऊन अमडापुर स्मशानभुमीच्या रस्त्यासाठी १० लक्ष रुपयांचा निधी मंजूर करत असल्याची घोषणा त्यांनी केली.


### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड, ( इन चॉर्ज श्री.व्ही.व्ही.राजुरकर, साहेब ) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६९४/२०२६** **ने.ता.१७/०९/२०२६**

**अर्जदार :-** १) शेषराव काशिराव गाडगे, वय अं.७५ वर्ष, धंदा-सेवानिवृत्त, २) गौतम शेषराव गाडगे, वय अं.४२ वर्ष, धंदा- व्यवसाय, ३) हर्षलता सुरेश गोपाळे, वय अं.४९ वर्ष, धंदा- गृहिणी, ४) वैशाली दिपक पखाले, वय अं.४६ वर्ष, धंदा- गृहिणी, अर्जदार क्र.१ ते ४ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, ५) रुपाली संजय खंडाईत, वय अं.४४ वर्ष, धंदा- गृहिणी, रा.ठाणेगांव, ता.कारंता, जि.वर्धा

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत हेमलता शेषराव गाडगे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१७/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२८/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




### नाशिकमध्ये आधुनिक कृषी शिक्षणावर भर

# कृषी महाविद्यालयाच्या नूतन इमारतीचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नाशिक** – शेतकऱ्यांना कर्जाच्या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी नव्या तंत्रज्ञानावर आधारित व्यवस्था उभी करणे आवश्यक आहे. कृषी क्षेत्रातील आव्हाने लक्षात घेऊन आधुनिकीकरण, नवे तंत्रज्ञान आणि संशोधनाच्या माध्यमातून उत्पादन खर्च कमी करून उत्पादकता वाढविण्यात कृषी महाविद्यालयांनी महत्त्वाची भूमिका बजावावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या दिंडोरी तालुक्यातील चाचडगाव येथील कर्मयोगी दुलाजी सीताराम पाटील कृषी महाविद्यालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास पालकमंत्री गिरीश महाजन, मंत्री छगन भुजबळ, दादाजी भुसे, नरहरी झिरवाळ, खासदार डॉ.शोभा बच्छाव, खासदार राजाभाऊ वाजे, खासदार भास्कर भगरे, महापौर हिमगौरी आहेर-आडके आदी उपस्थित होते.

### शिवसेना जिल्हाप्रमुख पराग गुडधे यांच्या विरुध्द

# भाजपाकडून डॉ.बोंडे यांच्या वक्तव्याबाबत पोलिसांत तक्रार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – भा.ज.पा.राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्याबद्दल शिवसेना जिल्हाप्रमुख पराग गुडधे यांनी बदनामीकारक वक्तव्य करुन मारण्याची धमकी दिल्याची तक्रार भाजपा महिला आघाडी प्रदेश सचिव अंजली तुमडाम यांचे नेतृत्वात ठाणेदार यांचेकडे एका निवेदनाव्दारे करण्यात आली आहे.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्याबद्दल जिल्हा प्रमुख पराग गुडधे यांनी समाजमाध्यमावर व्हिडीओ तयार करुन तो पोस्ट केला व तो व्हिडीओ आम्ही बघितला. त्यामध्ये पराग गुडधे यांनी डॉ.अनिल बोंडे यांना म्हटले की, 'तुमच्या बापाची जागीर नाही, डॉ.बोंडे तोंड सांभाळुन बोला, तोंड फोडल्याशिवाय राहणार नाही' असे डॉ.बोंडे साहेबांबद्दल वक्तव्य करुन मारण्याची धमकी दिली. गैरअर्जदारांचे हे कृत्य व वक्तव्य हे स्वतःच्या प्रसिध्दीकरीता केलेले असून त्यामुळे डॉ.अनिल बोंडे यांच्या चाहत्यांची व माझी मने दुखावलेली आहे त्यामुळे पराग गुडधे यांनी बदनामीकारण वक्तव्य केल्यामुळे त्यांचेवर कायदेशिर कारवाही करण्यात यावी, अशी मागणी भाजपा महिला आघाडी प्रदेश सचिव अंजली तुमराम, जि.प.माजी सभापती अर्चना मुरुमकर, प्रसिध्द स्रि रोग व प्रसुती तज्ञ डॉ.मनोहर आंडे, माजी जि.न.सभापती विक्रम ठाकरे, विद्या भुंबर, चैताली ठाकरे, प्रतिभा महल्ले, भारती चिंचमलातपुरे, राजेश शहाणे, नंदकिशोर आजनकर, नरेंद्र बेलसरे, ॲड.रोशन धोंडे, मनिष फरकाडे, प्रणित कुबडे, नितीन गुर्जर, विनय मालपे, जितेंद्र शिंगरवाडे, प्रभाकर काळे, कल्पना निंभोरकर, प्रगती ढोलदी आदींनी केली आहे.

### ब्राह्मण समाजातर्फेही आजपासून उपोषण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

*जालना* – ब्राह्मण समाजाच्या प्रलंबित मागण्यांसाठी आणि विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आजपासून (२९ ऑगस्ट) जालन्यातील महात्मा गांधी चमन येथे बेमुदत उपोषण सुरू करण्याची घोषणा कार्यकर्ते दीपक रणनवरे यांनी केली आहे. परशुराम आर्थिक विकास महामंडळाची स्थापना दोन वर्षांपूर्वी झाली असली, तरी अद्याप पुरेसे कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले नाहीत. या महामंडळासाठी सरकारने १,००० कोटी रुपयांचा निधी तात्काळ मंजूर करावा, ही रणनवरे यांची मुख्य मागणी आहे. यापूर्वीही त्यांनी महामंडळाच्या विविध मागण्यांसाठी दोन वेळा आंदोलने केली आहेत.

